# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १४ जुलै २०२६



प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## खूप काही सांगतात

ओळखावे डोळ्यातले,
प्रेम भाव भरलेले.
प्रेमावर आहे जग,
आनंदाने तरलेले. १

तुझ्या डोळ्यात दिसते,
मला प्रेमाचा सागर.
तुझ्या प्रेम सागरात,
घेतो भरून घागर. २

खरे खरे सांगतात
तुझ्या डोळ्यातले भाव.
प्रेम द्यावे प्रेम घ्यावे,
करू नये कधी घाव. ३

प्रेमविरा प्रेम कर
मनामध्ये प्रेम भर
प्रेम करता करता
संकटांना दूर कर. ४

पाहताच तुझे डोळे,
खूप काही सांगतात
मनातले दु:ख सारे
अश्रूतुनी सांडतात. ५



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## निबंधलेखन स्पर्धेत वंदेमातरम कॉलेजची विद्यार्थिनी कु. संस्कृती पाळवदे यांचा राज्यातून द्वितीय क्रमांक



**बीड (प्रतिनिधी) :** दि.१४ एप्रिल २०२६ रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी मतदानाचा हक्क, वारसा हक्क, प्रसूती रजेचा हक्क, इत्यादी केलेले कार्य या विषयावर राज्यस्तरीय निबंधलेखन स्पर्धेत ITI डिप्लोमा महाविद्यालय / MCVC गटातून बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथील वंदेमातरम महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु.संस्कृती उषा भगवंतराव पाळवदे यांच्या उत्कृष्ट लेखनकौशल्याची, वैचारिक प्रगल्भतेची व स्पर्धेतील उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने कु.संस्कृती पाळवदे यांची द्वितीय विजेता म्हणून सर्वानुमते निवड केल्याचे जाहीर केले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल कु.संस्कृती पाळवदे यांना दि. १५ जुलै २०२६ रोजी मुंबईला विजेत्यांच्या गौरव व बक्षीस वितरण समारंभात निमंत्रित करून कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र राज्य विभागाचे मंत्री महोदय मा. श्री. मंगल प्रभातजी लोढा साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत गौरविण्यात येणार आहे ! त्यामुळे कु.संस्कृती पाळवदे यांचे सर्वत्र हार्दिक अभिनंदन होत आहे !भविष्यातही कु.संस्कृती पाळवदे यांचे उत्कृष्ट लेखनकौशल्य, वैचारिक प्रगल्भता वंचित समाजाच्या प्रगतीसाठी कामी येवो !

## "जमीन गेली तर जगायचे कसे?" असा सवाल



**छत्रपती संभाजीनगर :** प्रस्तावित सहा पदरी खानदेश एक्सप्रेसमुळे जमिनी जाण्याच्या भीतीने चौका गावातील शेतकरी हवालदिल झाले आहेत. या पार्श्वभूमीवर रविवारी "तिफण लोक-अदालत" संपन्न झाली. यात शेतकऱ्यांनी आपल्या भावना आणि वेदना मांडल्या."सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समिती" आणि "तिफण डिजिटल" यांच्या संयुक्त विद्यमाने ही लोकअदालत झाली. सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवाजी हुसे यांनी याचे संयोजन केले.लोकअदालतीत बोलताना शेतकऱ्यांनी सांगितले की, सहा पदरी रस्त्यामुळे आमच्या पिढ्यानुपिढ्यांच्या शेतजमिनी जात आहेत. "जमीन गेली तर आम्ही जगायचे कसे? मुलांचे भविष्य काय?" असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली."चौका गावाचा अस्तित्वाचा प्रश्न आहे. आमची माती ही आमची अस्मिता आहे" असे शेतकऱ्यांनी सांगितले. यावेळी ग्रामपंचायत पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. शेतकऱ्यांचे शिष्टमंडळ लवकरच विभागीय आयुक्त कार्यालयात निवेदन देणार आहे. "एकजूट आपली - हक्क आपला - लढा आपला" अशा घोषणा देत त्यांनी आपला लढा सुरू ठेवण्याचा निर्धार केला. या लोकअदालतीचे थेट प्रक्षेपण तिफण डिजिटलवर करण्यात आले.मोबदला आणि पुनर्वसन नको आमची कळकळीची विनंती एकच आहे शासनाला की रस्ता एक हजार मीटर पाठीमागून घ्यावा अशी शेतकऱ्यांची मागणी आहे .या बैठकीस मा. सभापती दगडू वाघ, मा. सरपंच संतोष वाघ, अशोक वाघ, अजिनाथ वाघ, बबन वाघ, रामभाऊ डोंगरे, डॉ. संतोष घाळगे, वाल्मिक डोंगरे, शामराव वाघ, गणेश कोठाळे, रामलिंग कोठाळे, संतोष बोंगाणे, पंडित वाघ, गोपीनाथ वाघ यांच्यासह अनेक शेतकरी, ग्रामस्थ व संघर्ष समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## साहित्यिक अय्युब पठाण यांचा सत्कार




**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** पैठण तालुक्याचे प्रसिद्ध साहित्य अय्युब पठाण लोहगावकर यांचा नुकतेच जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दरेगाव तालुका पैठण जिल्हा छत्रपती संभाजी नगर येथील मुख्याध्यापक तथा प्रसिद्ध कवी सुनीलराव डोकेसर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ देऊन पठाण यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शाळेतील शिक्षक कचरूलाल जैस्वालसर अमोलसर श्रीमती कल्याणी औटी मॅडम आणि परिसरातील नागरिक व शाळेतील विद्यार्थी हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002